# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(formerly University of Pune)

**व्यवस्थापन प्रतिनिधींच्या अंतिम मतदार यादीमध्ये एकाच प्रतिनिधीचे एक नाव दोनदा आल्यामुळे सदर नाव मतदार यादीमधून वगळण्याबाबत**

## जाहीर प्रकटन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(त)[28(2)(p)] अन्वये सहा (६) प्रतिनिधी संलग्न महाविद्यालय/परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून विद्यापीठ अधिसभेवर निवडून देण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने मतदार नावनोंदणीचे अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळामार्फत मागविण्यात आले होते. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांपैकी सर्व बाबींची पूर्तता करणाऱ्या अर्जातील व्यवस्थापन प्रतिनिधींची तात्पुरती मतदार यादी सोमवार, २१ ऑगस्ट, २०१७ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. या अनुषंगाने प्रसिध्द केलेल्या मतदार यादीमध्ये काही आक्षेप/दुरुस्ती असल्यास त्या संबंधितांकडून मंगळवार, दि. २२ ऑगस्ट, २०१७ ते शनिवार, दि. २६ ऑगस्ट, २०१७ रोजी ६.०० वाजेपर्यंत विद्यापीठाच्या संकेतस्थळामार्फत मागविण्यात आले होते. विहित मुदतीत सादर केलेल्या अर्जाची प्रत (Printout) आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करण्याची अंतिम मुदत गुरुवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत देण्यात आली होती. विहित मुदतीत अर्ज सादर केलेल्या परंतु अर्जामध्ये काही त्रुटी असलेल्या व्यवस्थापन प्रतिनिंधींनी कागदपत्रांची मुदतीत पूर्तता केलेली असल्याने अशा व्यवस्थापन प्रतिनिधींची नावे अंतिम मतदार यादीमध्ये समाविष्ट केलेली आहेत. अंतिम मतदार यादी दि. ०७ सप्टेंबर, २०१७ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर यादी प्रसिध्द झाल्यानंतर या यादीमध्ये अ.क्र. १६७ व १६८ वर **श्री. पाटील उदयसिंह सुभाष** या एकाच संस्था प्रतिनिधीचे नाव दोन वेळा प्रसिध्द झालेले आहे, असे विद्यापीठाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. ८ च्या तरतूदीन्वये संस्था प्रतिनिधींच्या अंतिम मतदार यादीमधील **अ.क्र. १६७ वरील श्री. पाटील उदयसिंह सुभाष** हे नाव व्यवस्थापन प्रतिनिधींच्या यादीमधून वगळण्यात आलेले आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे- ४११००७
संदर्भ क्र. : साकुपुविनि / ९४२
दिनांक : २९/०९/२०१७

AS 29/9/17

(डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

D:\Election 2017\Sanstha Pratinidhee(Management Representatives)\Circular\Extension-Management-Representatives-Election-2017.docx